**Aayushi International Interdisciplinary Research Journal (AIIRJ)**

VOL- VI ISSUE-XII DECEMBER 2019 | PEER REVIEW e-JOURNAL | IMPACT FACTOR 5.707 | ISSN 2349-638x

# महाराष्ट्रातील ओबीसींच्या राजकारणातील मंडल आयोगाचे योगदान

**डॉ. एम. ए. केसरकर**

राज्यशास्त्र विभागप्रमुख

के. एम. सी. महाविद्यालय, खोपोली

**सारांश:**

*महाराष्ट्रातील एका मोठ्या पट्ट्यात ओबीसी म्हणजे इतर मागासवर्गीय जातींनी आपले वर्चस्व निर्माण करून शेती आणि त्याबरोबरील जोडधंदा, व्यापार शिक्षण यात आपले स्थान निर्माण केलेले आहे. शिवाय १९८० साली आलेल्या मंडल आयोगाने त्यांना आरक्षणाचा लाभ मिळवून दिला आहे. त्यातून या जातींना सधनता तर आलीच शिवाय सरकारी नोकऱ्या आणि शिक्षण क्षेत्रात वर्चस्व प्रस्तापित करता आले. १९८० दशकात मंडल आयोगाच्या प्रभावामुळे या जातींना शेतकरी संघटनेत महत्वाची पदे मिळाली शिवसेना व भाजपा यासारख्या पक्षांना या जातींचा पाठींबा मिळत गेला, त्यातून या पक्षांनी या जातींना संघठीत करून त्यांचे नेतृत्व केले आहे. हे नेतृत्व उभे राहिण्यात मंडल आयोगाचे मोठे योगदान आहे, त्याचीच मांडणी थोडक्यात करण्याचा येथे प्रयत्न केला आहे.*

*बीज शब्द : कॉग्रेसचीभूमिका, मंडल आयोग, ओबीसी नेतृत्वाचा उदय*

ओबीसींनी स. १९८९ व १९९० च्या लोकसभा व विधानसभा निवडणुकीत काँग्रेसला हादरा दिला या काळापासून महाराष्ट्र स्तरावर काँग्रेसला ओबीसी मतदारांनी दूर लोटले. स. १९९१ च्या काळात सुधाकरराव नाईक महाराष्ट्राचे मुख्यमंत्री बनले, परंतु तो पर्यंत ओबीसी समाज काँग्रेसपासून बराच दूर गेलेला होता त्याची परिणिती महाराष्ट्रात भाजप सेना युती १९९५ ला सत्तेवर येण्यात झाली. यानंतर मात्र ओबीसी समाज काँग्रेसच्या संपर्कात व पूर्ण नियंत्रणात आला नाही

तसे पहिले तर उच्च जातींच्या विरोधात भूमिका घेतली पाहिजे असे स्वातंत्र्याच्या प्रारंभीच्या काळात कोणत्याच पक्षाला वाटले नाही. मात्र काँग्रेसच्या दुटप्पी राजकारणात राम मनोहर लोहिया यांनी मात्र मागासलेल्या जातीचे राजकारण केले पाहिजे अशी भूमिका घेतली. काका कालेलकर आयोगाने ओबीसी जातींना ज्या सवलतींच्या शिफारसी केलेल्या होत्या, त्या काँग्रेस सरकारने बसणात गुंडाळून ठेवल्या होत्या त्यामुळे उत्तर भारतासह सर्व भारतभर काँग्रेस विरोधात असंतोष खदखदू लागला होता याचा फायदा घेत समाजवादी नेते राममनोहर लोहिया यांनी उत्तर भारताच्या राजकारणात मागासवर्गीयांना विशेष संधीचा आग्रह धरणारा जातीसिध्दांत अत्यंत प्रभावीपणे मांडून मागासवर्गीयांच्या आंदोलनाची धार तीव्र करून बीजे रोवली. त्यामधून 'डॉ. राममनोहर लोहियांच्या जातीसिध्दांताचा उत्तर भारताच्या राजकारणात प्रचंड प्रभाव पडून सत्तारुढ काँग्रेसच्या विरोधात सर्व मागासवर्गीय जाती एकजूट झाल्या त्याच्या परिणीतीतून अनेक राज्यात बिगर काँग्रेसची सरकारे सत्तेवर आली. यातून उत्तर प्रदेशात इतर मागासवर्गीयांना मोठया प्रमाणात प्रतिनिधित्व मिळाले.

स. १९७७ साली जनता पक्षाने इतर मागासवर्गीयांना काकासाहेब कालेलकर शिफारसी लागू करण्याचे अभिवचन दिले त्यातून या निवडणुकीत उत्तर भारतात इतर मागासवर्गीय जनतेकडून जनता पक्षाला अभूतपूर्व प्रतिसाद मिळाला व इतर मागासवर्गीयांचे प्रतिनिधी मोठया संख्येने निवडून आले त्यातूनच सत्तेची सुत्रे घेतल्यानंतर काका कालेलकर आयोग शिफारसी लागू करण्यापेक्षा बी. पी. मंडल यांच्या अध्यक्षते खाली २२ डिसेंबर १९७८ रोजी दुसरा इतर मागासवर्गीय आयोग नियुक्त करण्यात आला.१

मंडल आयोगाने आपला अहवाल १९८० साली केंद्रसरकारला सादर केला मात्र केंद्रात काँग्रेसचे सरकार असल्याने त्याची अंमलबजावणी करतांना वेळ लागला मंडल आयोगाच्या शिफारशीचे देशपातळीवर दलित व ओबीसी जातींनी स्वागत केले. मात्र इतर राज्याच्या तुलनेत महाराष्ट्रात तो लवकर लागू झाला नाही. 'महाराष्ट्राच्या विधानसभेत मंडल आयोगावरील चर्चेसाठी प्रखर लढा दिला गेला. मंडल आयोगाच्या कार्यवाहीसाठी राज्यभर जिल्हा कचेऱ्यांवर सत्याग्रह व मोर्चे काढण्यात आले. महाराष्ट्रातून दि. ६

ऑक्टोंबर १९८६ रोजी २५० कार्यकर्त्यांनी सत्याग्रह केला. त्यामध्ये शेतकरी कामगार पक्षाचे खासदार दि. बा. पाटील, ओबीसी संघटनेचे अध्यक्ष कॉ. जी. एल. पाटील, कार्याध्यक्ष ॲड. जनार्दन पाटील, राष्ट्रीय मागास वर्ग महासंघाचे उपाध्यक्ष गजानन भोवर, ॲड. नारायणराव कोळी, श्रीमती शांती नाईक, नामदेवराव सुतार, नेताजी गुरव, महादेव पाटील, बहुजन संघर्ष समितीचे नागेश चौधरी व जनता पक्षाचे मुकुंदराव पाटील आदी नेत्यांनी भाग घेतला.२

मंडल आयोगाने ज्या जातींना इतर मागास वर्ग जातीत समाविष्ट केले होते, त्यांचे संघटन करुन मागास जाती विरुध्द पुढारलेल्या जाती असा लढा उभारावा आणि मागास जातींना महाराष्ट्राच्या सत्तेत वाटा मिळवून द्यावा त्यांच्या प्रगतिचा मार्ग खुला करावा या हेतूने महाराष्ट्रात मंडल आयोगाची दखल सर्वच राजकीय पक्षांनी घेतली.

'१९८५ नंतरच्या काळात माळी, धनगर आणि वंजारी जातीमध्ये राजकीय महत्वाकांक्षा निर्माण झाली. विविध राजकीय पक्षांनी त्यांची दखल घेऊन या जातींच्या नेत्यांना अधिक वाव देण्याचा मार्ग स्विकारला. त्यामुळे माळी जातीतून छगन भूजबळ, ना. स. फरांदे, धनगर जातीतून शिवाजीराव शेंडगे, अण्णा डांगे, वंजारी जातीतून गोपीनाथ मुंडे बबन ढाकणे यांसारखे ओबीसी नेते व कार्यकर्ते सर्व राजकीय पक्षांमध्ये दिसू लागले'३

अशा प्रकारे महाराष्ट्रात ओबीसी राजकारण प्रभावी बनले. महाराष्ट्राच्या शासन व अर्थसत्तेत वरिष्ठ जातींची मक्तेदारी, कोकण, मराठवाडा व विदर्भाची झालेली ओबीसींची उपेक्षा यांचे महाराष्ट्राच्या सामाजिक व राजकीय जीवनावर परिणाम झाले.

**निष्कर्ष :**

1. ओबीसी हा महाराष्ट्राच्या राजकारणातील एक महत्वपूर्ण घटक बनला.
2. ओबीसी गटातून बहुविध नेतृत्वाचा उदय झाला
3. मंडल आयोगाचे ओबीसीच्या उदयामध्ये मोलाचे योगदान आहे.
4. विविध पक्षांची भूमिका ओबीसीच्याबाबत बहुविध प्रकारची स्पष्ट झाली.

**संदर्भ – तळटीपा :**

1. पाटील, देवरे आणि वाघ (सं.), मंडल आयोग : ओबीसींच्या लोकशाही मुक्तीचा जाहीरनामा (भाग : १), प्रकाशक जनार्दन पाटील, मुंबई प्रथमावृत्ती - १९९०, पृ. – २२.
2. उपरोक्त, पृ. – २४, २५.
3. पळशीकर सुहास, जात व महाराष्ट्रातील सत्ताकारण, सुगावा प्रकाशन, पुणे, द्वितीयावृत्ती – एप्रिल – २००३, पृ. – ४१.

ISSN 2349-638X
www aiirjournal.com